स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१५०  दि. १५/०७/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : युवा पिढी मार्गदर्शन कार्यक्रमाबाबत..
संदर्भ : १. मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे पत्र
२. मा.कुलगुरू यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र.व्हीसी ३९६०, दि.१५ जुलै २०२६ रोजी अग्रेषित

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये समाजातील बदलती परिस्थिती, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव, तसेच विविध बाह्य घटकांमुळे युवा पिढीच्या विचारसरणी व वर्तनामध्ये लक्षणीय बदल होताना दिसून येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबत त्यांच्या मानसिक, सामाजिक व नैतिक जडण–घडणीवर विशेष लक्ष केंद्रीत करणे अत्यावश्यक झाले आहे. चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक अपराध, अमंली पदार्थांचे दुष्परिणाम, बाल गुन्हेगारी, समाजाप्रती नैतिक जबाबदारी याबाबत जागरूकता निर्माध करणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

त्याअनुषंगाने दि. १६ जुलै २०२६ रोजी, गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे येथे सकाळी ११.०० ते ०१.०० दरम्यान मा.श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या उपस्थितीत युवा पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमामध्ये अमंली पदार्थ विरोधी अभियान, महिला व बालकांची सुरक्षा, सायबर सुरक्षा व जनजागृती, वाहतूक, सामाजिक व नैतिक जबाबदारी, बाल गुन्हेगारी इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील इच्छूक रासेयो स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यानां सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबत सुचित करावे. कळावे, ही विनंती.

Bhame.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे पत्र

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 14 JUL 2026
आवक क्रमांक व्हीसी 3960
जावक दिनांक 15 JUL 2026

प्रति,

मा. कुलगुरु,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे.

**(लक्षवेध** - श्री प्रफुल्ल पवार - कुलसचिव)

**विषय** : युवा पिढी मार्गदर्शन कार्यक्रम अनुषंगाने प्रतिनिधी उपस्थित ठेवणेबाबत.

—ooo—

सामाजातील बदलती परिस्थिती, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव, तसेच विविध बाह्य घटकांमुळे युवा पिढीच्या विचारसरणी व वर्तनामध्ये लक्षणीय बदल होताना दिसून येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासोबत त्यांच्या मानसिक, सामाजिक व नैतिक जडण-घडणीवर विशेष लक्ष केंद्रीत करणे अत्यावश्यक झाले आहे. २०२६-२०२७ या चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक अपराध, अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, बाल गुन्हेगारी, समजाप्रती नैतिक जबाबदारी याबाबत जागरूकता निर्माण करणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

यासाठी पोलीस प्रशासन व शैक्षणिक संस्था / शाळा (इ.८वी पासून पुढे) / महाविद्यालय यांनी एकमेकांशी समन्वय साधून एकत्रितपणे खालील नमूद विषयांवर सखोल चर्चा करणे, ध्येय-धोरणे निश्चित करणे व प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्ययोजना आखणे गरजेचे आहे. पोलीस प्रशासन व शैक्षणिक संस्थांच्या या एकत्रित प्रयत्नांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत आदर, सामाजिक बांधिलकी व जबाबदारीची भावना विकसित होईल. समाज अधिक सुरक्षित, भयमुक्त व ड्रग्ज-फ्री करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून, युवा पिढीला योग्य दिशा देण्यासाठी हा एक प्रभावी टप्पा ठरेल.

त्याअनुषंगाने **दिनांक १६/०७/२०२६** रोजी **गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे** येथे **सकाळी ११.०० ते ०१.००** वा. दरम्यान **मा.श्री अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर** यांच्या उपस्थितीत युवा पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमामध्ये खालील विषयांवर चर्चा करून पुढील दिशा ठरवता येईलः

- अंमली पदार्थ विरोधी अभियान (ड्रग्ज फ्री पुणे)
- महिला व बालकांची सुरक्षा
- सायबर सुरक्षा व जनजागृती
- वाहतूक - सामाजिक व नैतिक जबाबदारी
- बाल गुन्हेगारी

तरी वरील नमूद विषयांचे महत्त्व लक्षात घेता, या विषयांशी संबंधित आपले विभागाकडील अधिकाऱ्यांसह आपल्या कार्यक्षेत्रातील खाजगी तथा शासकीय महाविद्यालय संस्थांचे प्रत्येकी **किमान ०५ प्रतिनिधी** (सक्षम अधिकारी, प्राचार्य व सदस्य) असे नमूद कार्यक्रमास उपस्थित ठेवणेकामी आपले कार्यक्षेत्रातील खाजगी तथा शासकीय महाविद्यालय / संस्था यांना पत्रव्यवहाराद्वारे सूचित करण्यात यावे, ही विनंती आहे.

**मा. पोलीस आयुक्त,**
**पुणे शहर यांचे मान्यतेने.**

(तेजस्वी सातपुते)
अपर पोलीस आयुक्त, गुन्हे
पुणे शहर

Savitribai Phule Pune University
Office of the Vice Chancellor
Ganeshkhind, Pune-7.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 236
दिनांक: 15 JUL 2026
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-